**<u>नि.फौ.ख.क्र.११४/२०२३</u>**
**<u>निशाणी क्र.९</u>**

## <u>दोषारोप</u>

मी, आर. बी. राऊत, न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग (कोर्ट क्र.२), कर्जत तुमच्याविरुद्ध खालीलप्रमाणे दोषारोप ठेवतो की,

१. **गणेश आण्णा गुंजाळ**
वय–३० वर्षे, धंदा– शेती,
रा. गुंजाळ वस्ती, नांदगाव,
ता. कर्जत, जि. अहमदनगर

पहिले– तुम्ही दि. २९/०४/२०२३ रोजी सायंकाळी ०६.०० वाजताचे सुमारास मौजे नांदगाव, ता. कर्जत, जि. अहमदनगर गावचे शिवारात फिर्यादी शेत गट क्र. २९८ मधुन सामाईक बांधावरुन गायींसाठी घास घेऊन येत असताना तुम्ही फिर्यादीला म्हणाला की, 'संगे तु आमच्या शेतातून जायचे नाही' असे म्हणुन फिर्यादीला मारहाण करुन ढकलुन दिले. त्यावेळी फिर्यादीने आरडाओरडा केला असता फिर्यादीचे पती, सासरे व मुलगा असे तेथे आले असता तुम्ही मानवी जीवित किंवा इतरांची व्यक्तीगत सुरक्षीतता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने दगड फेकून मारले त्यामुळे तुम्ही फिर्यादीचे सासरे यांच्या पाठीत व मुलगा कृष्णा याचे उवजे हाताच्या मनगटाच्या किरकोळ दुखापतीस कारणीभुत ठरलात व त्यायोगे तुम्ही भारतीय दंड विधान कलम ३३७ अन्वये शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणार असा अपराध केला आहे.

दुसरे– उपरोक्त दिवशी,उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण करुन ढकलून देऊन तिच्या डाव्या हाताच्या मनगटाजवळ इच्छापूर्वक शारीरिक दुखापत केली तसेच तुम्ही फिर्यादी व साक्षीदारांना दगड फेकून मारुन फिर्यादीचे सासरे यांच्या पाठीत व मुलगा कृष्णा याचे उवजे हाताच्या मनगटाजवळ इच्छापूर्वक शारीरिक दुखापत केली व त्यायोगे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ३२४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला याच न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केलेला आहे.

तिसरे– उपरोक्त दिवशी,उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण करुन ढकलुन देऊन तिला इच्छापूर्वक शारीरिक दुखापत केली व त्यायोगे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ३२३ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला याच न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केलेला आहे.

चौथे– उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही फिर्यादीला जाणीवपूर्वक शिवीगाळ करुन अपमानित केले जेणेकरुन त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कृत्य घडेल व त्यायोगे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ५०४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला याच न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केलेला आहे.

आणि मी याद्वारे असा निर्देश देतो की, उक्त दोषारोपाबद्दल तुमची या न्यायालयाद्वारे संपरीक्षा करण्यात येत आहे.

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.01.09 17:18:22 +0530

ठिकाण : कर्जत (आर. बी. राऊत)
दिनांक: ०९/०१/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र.२)
कर्जत.

**<u>प्रमाणपत्र</u>**

दोषारोप मधील मजकुर आरोपी यांना मराठीमध्ये वाचून व समजावून सांगितला. आरोपीचे निवेदन स्वतंत्रपणे नोंदविले आहे.

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.01.09 17:18:27 +0530

ठिकाण : कर्जत (आर. बी. राऊत)
दिनांक: ०९/०१/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र.२)
कर्जत.